दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com
सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १९६ वा | सोमवार, दि. १० मार्च २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

## पुढील 5 दिवस मुसळधार पाऊस, 5 जिल्ह्यांना बसणार तडाखा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वातावरणामध्ये सातत्यानं मोठा बदल होत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी देशभरात कडाक्याची थंडी पडली होती, मात्र आता उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. आता वातावरणाबाबत आयएमडीकडून पुन्हा एकदा मोठी अपडेट देण्यात आली आहे. पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून, आयएमडीकडून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुढील पाच दिवस हिमाचल प्रदेश आणि आसपासच्या प्रदेशात मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. पावसासोबतच जोरदार बर्फवृष्टी देखील होऊ शकते असं आयएमडीनं म्हटलं आहे. आजपासून राज्यात पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. वातावरणात अचानक झालेल्या बदलांमुळे हिमाचल प्रदेशमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## शर्यतीतील बैलगाडा प्रेक्षकांत घुसून तरुणाचा मृत्यू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बैलगाडा शर्यतीत वेगाने धावणारा बैलगाडा प्रेक्षकांच्या गर्दीत घुसल्याने घडलेल्या दुर्घटनेत एका तरुणाचा मृत्यू झाला. सांगोला तालुक्यातील महूदजवळ ही दुर्घटना घडली. सुरेश हरिअप्पा सरगर असे या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. महूद-महिम परिसरात अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या सहकार्याने बैलगाडा शर्यत भरविण्यात आली होती. या शर्यतीत सोलापूरसह आसपासच्या जिल्ह्यातील सुमारे २५० बैलगाडे उतरले होते. ठरल्याप्रमाणे बैलगाडा शर्यतीला उत्साहात सुरुवात झाली. हजारो प्रेक्षक शर्यत पाहण्यासाठी हजर होते. त्याच वेळी दोन बैलगाडे वेगाने धावत असताना अचानकपणे त्यातील एक बैलगाडा नियंत्रण सुटल्याने प्रेक्षकांच्या गर्दीत घुसला. तेव्हा गोंधळ उडाला. बैलगाड्याची सुरेश सरगर यास जोरदार धडक बसली. त्याच्या छातीला जोरात मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यास तातडीने रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला.

# 'अजितदादा... आम्ही न्याय मागतोय, तुमच्या एका आमदारामुळे राज्य नासत चाललंय'

## डोळ्यात अश्रू अन वैभवीची आर्त मागणी

**बारामती (कटूसत्य वृत्त):-** मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची कन्या वैभवी हिने रविवारी बारामती झालेल्या आक्रोश मोचार्नंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे न्याय देण्याची मागणी केली आहे. माध्यमांशी संवाद साधताना वैभवीने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

वैभवी म्हणाली, दादा, माझे वडील गेले आहेत, आम्ही न्याय मागतो आहे. आम्हाला लवकरात लवकर न्याय द्या. या प्रकरणाची सखोल चौकशी करा. तुमच्या पक्षातील एका आमदारामुळे आज राज्य नासत चाललेय. ते जे करत आहेत त्यामुळे आमच्यासारख्या सर्वसामान्यांना जगणे मुश्किल होत चालले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणणारे व्यक्तिमत्व आहे. त्यांच्याकडे मी न्यायाची मागणी करते. आमच्या भागात अनेक गंभीर प्रकरणी घडली आहेत, त्याचीही सखोल चौकशी व्हावी अशी मागणी वैभवी हिने केली.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्याबाबत वैभवी देशमुख म्हणाली, आमची पहिल्यापासूनच एकच भूमिका आहे ती म्हणजे माज्या वडिलांना न्याय मिळाला पाहिजे. खंडणीमुळे माज्या वडीलांची हत्या झाली. ती खंडणी नेमकी कोणाकडे जाते, हा सुद्धा आम्हाला पडलेला एक प्रश्न आहे. माज्या वडीलांसंबंधी घटना घडलेली असताना अजूनही काही घटना घडत आहेत. वडीलांच्या खूनाचे जे फोटो व्हायरल केले जात आहेत, त्यातून मृतदेह समोर असतानाही आरोपी कसा अमानुष छळ करत आहेत, हे दिसून येते. या मागे निश्चित कोणाचा तरी हात, मोठा




पाठींबा आहे. आज तीन महिने झाले महाराष्ट्र न्यायासाठी आस लावून बसला आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदपवार) पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार हे सुद्धा याप्रसंगी उपस्थित होते, संतोष देशमुख हत्या प्रकरणात जे कोणी आरोपी असतील त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी यावेळी प्रसार माध्यमाच्या समोर बोलताना व्यक्त केली.

आजच्या निषेध मोर्चा प्रसंगी बारामती शहरातील बाजारपेठे मधील दुकाने कडकडीत बंद ठेवण्यात आली होती, बारामती मधील जन आक्रोश मोर्चा कालावधीत व्यापारी महासंघाने पाठिंबा दिल्यामुळे सर्व व्यापारी बांधवांनी आप आपली दुकाने बंद ठेवून सहकार्य केले. बारामती शहरातील या मोर्चा दरम्यान चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, या मोर्चामध्ये हजारोच्या संख्येने महिला, नागरिक,लहान मुले, व विविध पक्षांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

## संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे - सुदीप चाकोते

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येने संपूर्ण समाजमन सुन्न झाले असून, या घटनेचे तीव्र पडसाद राज्यभर उमटले आहेत. त्यांच्या अकाली आणि दुर्दैवी मृत्यूने गावासह समस्त समाज हळहळ व्यक्त करत आहे.

राष्ट्रीय वीरशैव लिंगायत समाजाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुदीप चाकोते यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला भेट देऊन त्यांना सांत्वना दिली. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, समस्त लिंगायत समाज देशमुख कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे आणि त्यांना न्याय मिळालाच पाहिजे.



सुदीप चाकोते यांनी प्रशासनाकडे मागणी केली की, या हत्येचा तातडीने सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच, अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सुरक्षेच्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात.

या घटनेमुळे संपूर्ण समाजात तीव्र संतापाची लाट उसळली असून, गावकऱ्यांनी आणि समाजबांधवांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला पूर्ण मदत आणि न्याय मिळेपर्यंत संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## महिलांनी घरच्या जबबादाऱ्या पार पाडत स्वत:साठी पण जगावं - प्रिया मेहेरकर

**कोंडी (कटूसत्य वृत्त):-** जिजाऊ ज्ञानमंदिर इंग्लिश मिडियम स्कूल, कोंडी येथे महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रथम माता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याकार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कीर्तनकार मीराताई बोगे, प्रियाताई मेहेरकर, समाजसेवक संतोष नीळ,प्राचार्या सुषमा नीळ, मुख्याध्यापक वैभव मसलकर, अर्चना औराद, उपस्थित होते.

यावेळी महिलांचे विविध खेळ घेण्यात आले. त्यात बुक बॅलेन्स, फुगे फोडणे, संगीत खुर्ची अशा खेळातून महिलांना पुन्हा बालपण जगायला मिळालं. यात फुगा फोडणे या खेळात प्रथम क्रमांक शीतल शिंदे, द्वितीय क्रमांक सुप्रिया माळी, तृतीय क्रमांक मोहिनी राऊत यांनी मिळवला. संगीत खुर्ची मध्ये अनुक्रमे अनीता भोसले, साधना



विश्वकर्मा, रूपाली भोसले यांनी मिळवला. बुक बॅलेन्स यात अनुक्रमे वैशाली शिंदे, कोमल बोबडे, अर्चना परबत यांनी पटकवला. तसेच प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या मातांना 'आदर्श गुणवंत माता' या पुरस्कारांने गौरवण्यात आले. यात शाकिरा मुलाणी, सोनाली शिंगारे, शिल्पा जाधव, बबिता चव्हाण यांना सन्मान चिन्ह, शाल, पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. खेळात विजयी झालेल्या स्पधेर्कांना ही भेटवस्तू देण्यात आले.

यावेळी 'एक मूठ धान्य समाजसेवेसाठी' ही संकल्पना राबवण्यात आली. यात सर्व महिला, विद्यार्थी, शिक्षक यांनी सहभागी होण्याचे आश्वासन दिले.महिलांना अंतरंग व बाह्यरंगाने कसे सुंदर बनवता येईल याविषयी प्रिया मेहेरकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच मीराताई बोंगे यांनी व्यावहारिक उदाहरणातुन महिलाना मार्गदर्शन केले.

याकार्यक्रमाचे सुत्रसंचलन शीतल कांबळे यांनी केले तर आभारप्रदर्शन महादेवी माने यांनी केले.

## राज्यातील कंत्राटदारांचा आज सर्व जिल्ह्यामध्ये धरणे आंदोलन व मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील सर्व विभागाकडील विकासकांची कामे केलेल्या कंत्राटदार यांची ९० हजार कोटींची देयके न मिळाल्याने महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, हॉट मिक्स असोसिएशन, सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशन, सोलापूर महापालिका ़ड्ढल्ल३१ू३ड्ढ१२ असोसिएशन यांच्या तर्फ अगोदरपासूनच ५ फेब्रुवारी २०२५ पासून काम बंद आंदोलन सुरू केलेले आहे या विषयावर शासनाने संघटने बरोबर मंत्रालय साबा मंत्री यांच्या बरोबर बैठक घेतली होती. तसेच संघटनेच्या वतीने शासनास सदर देयके देण्यासाठी दिल्ली बॅक फेडरेल असोसिएशन यांचा सविस्तर प्रस्ताव ही देण्यात आला होता व संबंधित आधिकारी यांची सदर मंत्रालय बैठकीत चर्चा झाली होती. परंतु या देयके देण्याच्या व संघटनेने सादर केलेल्या मागण्या विषयावर अजुनही शासनाकडून काहीही ठोस गोष्टी साध्य झाले नाही हे अत्यंत खेदजनक आहे या सर्व गोष्टी चा निषेध नोंदविण्यासाठी सोमवार दि १० मार्च रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालय येथे धरणें आंदोलन व मोर्चा आंदोलन होणार आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना चे राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले यांनी माहिती दिली आहे.

## जुनी मिल जागेसाठी पैसे भरलेल्या नागरिकांना कुमार करजगी यांचे जाहीर आवाहन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सन १९६३ साली १५००० मजूर काम करीत असलेली जुनी मिल मालक मुरारका यांनी कामगार कपात सुरु केल्याने त्या विरोधात मिलमध्ये कामगारांनी संप सुरु केला. मिल मालकाने कामगारांच्या संपाकडे दुर्लक्ष करून मिलमध्ये कामगार कपात सुरु केल्याने कामगारांनी मिल मालकाचा पुतळा मिलच्या गेट समोर जाळला. कामगारांनी आपला पुतळा जाळला या घटनेचा मिल मालकाला प्रचंड



राग आला आणि त्यांनी १५००० मिल कामगार काम करीत असलेली जुनी मिल तडकाफडकी बंद केली. मिलकडील आपले पैसे वसूल करण्यासाठी बँक ऑफ बडोदाने, केंद्र व राज्य सरकार व इतर धनको मंडळींनी उच्च न्यायालयामध्ये सूट फाईल केला.गरीब कामगारांना कोर्टाकडून त्यांच्या कष्टाचा पैसा मिलच्या मशनरी व इतर मालमत्ता विक्री करून २५ वषार्नंतर सुद्धा मिळाला नाही. मुंबई हायकोर्ट रिसिव्हरने सदर मिलची जमीन १९८८ साली जाहीर लिलावाने विक्रीस काढली असता कामगार पुत्र कुमार करजगी यांनी जुनी मिलच्या जागा विक्रीतून गरीब कामगारांना केंव्हा पैसे मिळतील याची कोर्ट रिसिव्हरकडे चौकशी केली असता कोर्टाकडून समजले की १९६३ साली कामगारांच्या पैशाचे क्लेम्स दाखल केले नसल्याने सदर मिलची जागा विक्रीतून बँक, केंद्र व राज्य सरकारचे पैसे मिळतील कामगारांना मिळणार नाहीत. हे समजताच कामगार पुत्र कुमार करजगी यांनी ९ ऑगस्ट १९८८ साली जुनी मिल बेकार कामगार वारसदार संघटना स्थापन करून हायकोटार्चे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी साहेब व बार कौन्सिलचे सेक्रेटरी एम.एम. वैद्य यांच्या सहकायार्मुळे कामगार पुत्र कुमार करजगी यांनी ९००० कामगारांचे क्लेम्स २५ वषार्नंतर न्यायालयात दाखल करून जुनी मिलच्या जागा विक्रीतून कामगारांना अग्रक्रमाने पैसे देण्याचे आदेश मिळविले परंतु जुनी मिलच्या सर्व जागा सोलापुरातील (पान 2 वर..)

## सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक महिला दिन साजरा

### स्वातंत्र्य लढ्यात महिलांचा सहभाग सर्वाधिक -अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथे जागतिक महिला दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर या होत्या. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आहे. यावेळी उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, प्रांत अधिकारी सदाशिव पडदुने, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, डॉक्टर स्मिता चाकोते, हास्य सम्राट दीपक देशपांडे आदी उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविक करताना सदाशिव पडदुणे म्हणाले की, 8 मार्च 1857 रोजी अमेरिकेतील महिलांनी उठाव करून कामावर सुट्टी मिळावी यासाठी मागणी केली. तर आठ मार्च 1917 रोजी रशिया येथे महिलांनी विविध हक्कासाठी आंदोलन केले, मोठ्या प्रमाणात महिला एकत्र आल्या (पान 2 वर..)

## पुस्तक माणसाचं आयुष्य समृद्ध करतात - कवी नितीन राऊत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुस्तकाच्या वाचनामुळे माणसाचे आयुष्य समृद्ध तर होतच, पण वाचनामुळे माणूस अहंकार शून्य बनतो. माणसाने कोणत्याच गोष्टीचा अहंकार बाळगू नये. कारण जगातली प्रत्येक गोष्ट ही क्षणभंगुर असते. त्यामुळे अहंकाराचा अंगीकार करू नये. जेवढी जास्त पुस्तक वाचाल तेवढे जास्त ज्ञान मिळेल आणि अहंकार गळून पडेल. असे मत कवी अनंत राऊत यांनी व्यक्त केले.

जिल्हा ग्रंथालय जिल्हा ग्रंथालयाच्या वतीने सोलापूर ग्रंथोत्सवाचे भव्य प्रदर्शन, ग्रंथ विक्री व साहित्य मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन शहरातील शिवछत्रपती रंगभवन येथे करण्यात आले होते सोलापूर ग्रंथोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी राऊत हे बोलत होते.

यावेळी सहाय्यक ग्रंथालय संचालक पुणे विभागाच्या शालिनी इंगोले, ज्येष्ठ पत्रकार सचिन जवळकोटे, साहित्यिक डॉ. शिवाजीराव देशमुख, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते देविदास सौदागर, ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे, सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विजयकुमार पवार, कार्यवाह साहेबराव शिंदे, उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे, निरीक्षक प्रमोद पाटील, निरीक्षक संजय ढेरे, निरीक्षक प्रदीप गाडे,अन्सार शेख,



विनोद गायकवाड,भीमाशंकर बिराजदार, सिद्धारूढ बेडग्नूर, सदाशिव बेडगे, ज्योतीराम चांगभले, महेश कुलकर्णी, गुरुनाथ गोविंदे, वृषाली हजारे, सारिका मोरे, यल्लाप्पा घोडके, विना गिडवीर, जगदीश ईडमशेट्टी, तात्यासाहेब भोसले, धोंडीराम जेऊरकर, निरसिन मिसालो, अशोक मोरे धोंडीराम बंडगर यांच्यासह ग्रंथोत्सव समिती, उपसमिती, संयोजन सहाय्य समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे उदघाटन दीप प्रज्वलन करून करण्यात आले. संगमेश्वर कॉलेज येथून सात रस्ता मार्गे रंग भवन पर्यंत ग्रंथ दिंडी काढण्यात आली होती.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचलनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर आयोजित महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत, कार्यक्रमाचे आयोजन ९ व १० मार्च २०२५ असे दोन दिवस करण्यात आले होते.

यावेळी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक देविदा सौदागर म्हणाले की, माणसाच्या हातात आज टीव्ही मोबाईल मुळेस मनोरंजन होईल पण संवाद होत नाही. पुस्तकांमधून माणूस घडतो पुस्तकांमधून मनोरंजना बरोबर प्रबोधनही होते वाचनामुळे संवेदनशील मन तयार झाले की माणसाला मनशांती मिळते. आत्महत्येचा सतत विचार मनामध्ये असणाऱ्या माणसाच्या हातात जर पुस्तक दिल तर त्यातल्या एका ओळीने त्याची आयुष्यही बदलून जाते म्हणून कोणताही निर्णय घेण्याअगोदर किमान एक तरी पुस्तक वाचणं गरजेचं आहे असे मतही सौदागर यांनी व्यक्त केले.

यावेळी जेष्ठ पत्रकार सचिन जवळकोटे म्हणाले की, कार्यक्रम पत्रिकेमध्ये अनेक नेत्यांची नावे होती पण ते एकही राजकीय नेता या कार्यक्रमाला हजर राहिलां नाही. कारण त्यांचा अन्‍ ग्रंथांचा काहीही संबंध नाही. कदाचित त्यामुळे ते आले नसावेत असा टोलाही त्यांनी लगावला.

उपस्थित मान्यवरांचे आभार जिल्हा ग्रंथालयाच्या वतीने प्रमोद पाटील यांनी मांनले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण देशमुख यांनी केले. हा ग्रंथोत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी कार्यालयाचे संजय ढेरे, प्रदीप गाडे, यल्लाप्पा घोडके, महेश कुलकर्णी आदी कार्यकर्ते कर्मचारी परिश्रम घेत असल्याचे दिसून आले.

या कार्यक्रमास सोलापूर जिल्ह्यामधून सार्वजनिक ग्रंथालयाचे पदाधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या ग्रंथ स्वदरम्यान प्रचंड प्रमाणात ग्रंथाची विक्री होत असल्याचे दिसून येत आहे. ग्रंथ विक्रीचे स्टॉल वरती गर्दी होत आहे आवडीचे ग्रंथ विकत घेतली जात आहेत.

वनवा तसाच आहे
पाऊस सरून गेला.
विस्तव विझेल कैसा
आतून पेटलेला
होता विकास आधी
जो दास बंगल्याचा
कित्येक पुस्तकांनी
तो झोपडीत नेला.

ज्या ज्या लोकांनी पुस्तकाची मैत्री केली ती लोक या जगात यशस्वी झाली निवडक दजेर्दार पुस्तक वाचली पाहिजे.

वाचन हे ताकासारखे आहे, ज्ञान लोण्यासारखे आहे.

जसं ताक लोण्यासाठी दही लावल्याशिवाय मिळत नाही तसं वाचल्यानंतर चिंतन केल्याशिवाय ज्ञान मिळत नाही. सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत यांनी याप्रसंगी व्यक्त केले. आपल्या गोड वाणीतून आपली प्रसिद्ध कविता ऐकवण्यात आली यामध्ये त्यांची गाजलेली कविता दुःख अडवायला उंबयार्सारखा मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा या कवितेने प्रेक्षकाची मने जिंकली.

देविदास सौदागर यांनी आपल्या भाषणांमधून पुस्तके विकत घेऊन वाचली पाहिजे दररोज दहा ते पंधरा मिनिट पुस्तके वाचलीच पाहिजे वाचनामुळे संवेदनशील समाज निर्माण होतो व संवेदनशील समाजाची आजची गरज आहे आजच्या भयावान वातावरणात त्याची जास्तच गरज आहे वाचन आजच्या परिस्थितीला उत्तर म्हणून पर्याय असू शकतो.

तर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणामध्ये, धर्म जात कधी आडवी नसते भक्तीला, चालत राहावं वाटा पुस्तक असावं सोबतीला. पुस्तक शब्दांच्या मोत्यात गुंफलेला हार वळणाच्या वाटेवर विसाव्याचा आधार. पुस्तक मोरपीस बनवून काळजावर फिरतं, दुःखाच्या जखमेवर हळूच फुंकर मारत. अशा अनमोल विचारांनी सभागृहास साहित्याची दिशा दाखवण्याचा प्रयत्न केला.

सायं दैनिक सोलापूर www.katusatya.in कटूसत्य katusatya@gmail.com मुख्य कार्यालय संपादक पांडूरंग हरिदास सुरवसे उपसंपादक सचिन मोहन जाधव सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

### आपणही होवू शकता ''मुक्त पत्रकार''

नमस्कार....,

आपणही ''मुक्त पत्रकार'' होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक ''मुक्त पत्रकार'' होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक ''कटूसत्य'' या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि ''मुक्त पत्रकार'' होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये ''मुक्त पत्रकार'' म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) ''मुक्त पत्रकार'' मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर ''मुक्त पत्रकार'' म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती ''मुक्त पत्रकार'' म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहिराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहिरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे ''मुक्त पत्रकार'' झाल्यानंतरच आपल्या जाहिराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच ''मुक्त पत्रकार'' होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दै.सा.कटूसत्य

टिपः- ''कटूसत्य'' व ''वृत्तदर्पण'' या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.

# स्त्री एक मार्गदर्शक, समर्थक, प्रेरणादायी व्यक्ती- सुचित्रादेवी देशमुख



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** आजचा दिवस जितका महिलांसाठी खास आहे, तितकाच तो संपूर्ण मानव समाजासाठीही खास आहे. कारण स्त्री एक मार्गदर्शक आहे. समर्थक आहे. प्रेरणादायी व्यक्ती आहे. ती आपल्या आयुष्यात कधी आई म्हणून, कधी बहीण म्हणून, कधी मैत्रीण म्हणून, तर कधी जीवनसाथी म्हणून असते. तिच्या प्रत्येक भूमिकेचा आपण आदर करायला हवा. त्यामुळे आपण आपल्या आयुष्यात असणाऱ्या प्रत्येक स्त्रीचे आभार मानले पाहिजे असे मत रेणुका महिला पतसंस्थेच्या चेअरमन सुचित्रादेवी देशमुख यांनी व्यक्त केले.

त्या नातेपुते येथील एस.एन.डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल मध्ये घेण्यात आलेल्या महिला दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होत्या.

यावेळी त्या पुढे बोलत असताना म्हणाले की, एस.एन.डी स्कूल मधील शिक्षक विद्यार्थ्यांना चांगल्या दजार्चे शिक्षण देतात. जीवनात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन करतात त्यांना योग्य दिशा देऊन विद्यार्थ्यांना सक्षम बनवतात असे प्रतिपादन सुचित्रा देशमुख यांनी करून महिला दिनाच्या निमित्ताने सर्व महिला शिक्षकांचा सत्कार करून उपस्थित सर्व महिला शिक्षकांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक संदीप पानसरे, स्कूल मॅनेजर शकूर पटेल, संस्थेचे पीआरओ मनोज राऊत तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# स्त्री - पुरुष समानतेचे तत्व रुजवणे ही काळाची गरज आहे - कॉ. आडम मास्तर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संयुक्त राष्ट्रीय संघाच्या अहवालानुसार स्त्रियांसाठी सर्वात असुरक्षित ठिकाण आहे, त्यांचे घर आपल्या देशात दर रोज १४० स्त्रियांचा जीव त्यांच्या जोडीदारांकडून किंवा कुटुंबातील सदस्यांकडून हिरावून घेतला जातो. एकूण बलात्कारांपैकी ८९ टक्के बलात्कार जवळच्या, ओळखीच्या व्यक्तींकडून होतात. दर सहा तासाला एका नवविवाहित तरुणीची हत्या केली जाते. इतकेच नाही तर दर वर्षी ५ लाख मुलींना जन्माजाधी गर्भातच मारून टाकले जाते. पितृसत्ताक व्यवस्था आणि नवउदार उपभोगवादी संस्कृती यांच्या युतीमुळे महिला व मुलींसाठी कुटुंबात व समाजात अत्यंत प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. सत्ताधारी भाजप आरएसएसच्या प्रतिगामी विचारसरणीमुळे याला खतपाणी घातले जात आहे. कामगार वगातील आणि अगदी सामाजिक कार्यकर्त्यांच्या घरात देखील पुरुषांना या सामाजिक वर्चस्वाचा मोह सोडवत नाही. ते देखील घरकामात समान वाटा उचलत नाहीत आणि प्रसंगी पत्नी किंवा मुलीला 'ताब्यात ठेवण्यासाठी' हिंसाचाराचा देखील वापर करताना दिसतात. आपल्याला कामगार वर्गात विषमतेची संस्कृती झुगारून स्त्री-पुरुष समानतेची तत्वे रुजवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून दत्त नगर लाल बावटा सिटू कार्यालय येथे संघटनेचे जिल्हा अध्यक्ष माजी नगरसेविका शेवंता देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महिलांविषयक कायद्यांचे चित्र प्रदर्शन आणि व्याख्यान पार पडले.

या चित्र प्रदर्शनात महिलांवरील लैंगिक अत्याचार व शारीरिक हल्ले, महिलांविषयक कायदे, महिलांच्या समस्या, वाढती महागाई, बेरोजगारी, धर्मांधता, सामाजिक गुलामी, शिक्षणाचा अधिकार, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक ऐक्य आणि जातीय सलोखा याची माहिती व संदेश देणारे चित्र प्रदर्शन आकर्षित ठरले.

या प्रसंगी व्यासपीठावर सिटूचे राज्य महासचिव एम.एच.शेख, जनवादी महिला संघटनेच्या राज्य अध्यक्षा नसीमा शेख, माकपाचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर), माजी नगरसेविका कामिनिताई आडम, सिटूचे सुनंदा बल्ला, शकुंतला पाणीभाते, फातिमा बेग, लिंगव्वा सोलापूरे, ॲड कॉ.अनिल वासम, कॉ.दत्ता चव्हाण, आदींची उपस्थिती होती.

प्रजा नाट्य मंडळ कलापथक शाहिरांनी क्रांतिगीते सादर केली.

यावेळी प्रास्ताविकात नसीमा शेख म्हणाल्या कि, अमेरिकेतील शिकागो या शहरातील कामगार महिलांनी १९०८ साली याच दिवशी वेतनवाढीच्या व कामाचे तास मर्यादित करण्याच्या मागणीसाठी सुरू केलेल्या संघषार्ची प्रेरणा होती. तेव्हापासून आजपर्यंत हा दिवस संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय कामगार महिला दिन म्हणून दर वर्षी साजरा केला जात आहे. जगभरात आणि विशेषतः आपल्या देशात भांडवली व्यवस्थेने या दिवसाचा खरा अर्थ लपवून त्याचा वापर व्यापारी पद्धतीने करण्यास सुरवात केली असली आणि महिलांच्या व घरगुती वापराच्या विविध वस्तूंचा सेल लावणे, प्रदर्शन भरवणे यासाठी या दिवसाचा वापर केला जात असला तरी देखील आजही हा दिवस कामगार महिलांच्या अधिकारांसाठी लढणाऱ्या संघटनांच्या दृष्टीने चळवळीचे मुद्दे व आपल्या न्याय्य मागण्यांसाठीचे लढे पुढे घेऊन जाण्याचा दिवस आहे. या वर्षी ८ मार्चच्या निमित्ताने कामगार महिलांच्या अधिकारांसाठीचे मागणीपत्रक घेऊन जाण्याचा निर्णय राष्ट्रीय पातळीवर घेतला आहे. या दिवसाच्या निमित्ताने नवउदार धोरणांमुळे निर्माण झालेले व्यवस्थागत आर्थिक संकट, महिलांचे श्रम स्वस्तात वापरून आपला नफा वाढवण्याचे भांडवली व्यवस्थेचे कारस्थान, घरातील बिन मोलाच्या श्रमामुळे त्यांच्यावर येणारे दुहेरी ओझे व या सर्व परिस्थितीमुळे वाढत चाललेली प्रचंड सामाजिक विषमता, आजारी व्यक्तींची देखभाल, बाल संगोपन या क्षेत्रात होत असलेले महिलांच्या श्रमाचे अवमूल्यन व शोषण, महिलांच्या समाजातील दुय्यम स्थानामुळे, असुरक्षित जीवनामुळे त्यांच्यावर कामाच्या ठिकाणी व घरी, दारी होत असलेली हिंसा व लैंगिक छळ आणि या सर्व अन्यायाच्या विरोधात एकजूट करून लढण्याची गरज आहे.

महाराष्ट्रात महिलांवर होणाऱ्या बलात्काराची व लैंगिक अत्याचाराची मालिका सुरु आहे. मुंबई, पुणे, संभाजी नगर, नागपूर, परभणी या शहरात घडलेल्या पाशवी आणि हृदयद्रावक घटना हे सूचित करतात कि, पुरोगामी महाराष्ट्र कुठे चालला आहे. घर, परिसर, कामाच्या ठिकाणी, प्रवास आणि कोणत्याही ठिकाणी महिलांना सुरक्षितता वाटत नाही. कारण पावलोपावली नराधमांची पिलावळ वाढत आहे. अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी सरकार जलदगतीने निर्णय घ्यायला व दोषींवर कारवाई करायला विलंब होत आहे. याचा धिक्कार सिटूचे राज्य महासचिव कॉ.एम.एच.शेख यांना केला.

सदर कार्यक्रम यशस्वी आरिफ शेख, अफसाना शेख, लता तुळजापुरकर, सुनीता नरोटे, शरीफा शेख, निलोफर शेख, संगीता एडके, सुवर्णा बोद्धूल, सायरा शेख, महमदी शेख, गीता वासम, राजेश्री पद्मा, बेबी मल्याळ, लता बल्ला, अरुणा शेट्टी, सुलोचना श्रीराम, निकिता गोणे, तबसुम शेख, राजेश्वरी बिंगी,अनिता म्हेत्रे, उमा कारमपुरी, राधाबाई जोरीगल, रंजना जाधव, मिताली निकंबे,अर्चना निकंबे,गायत्री आमाटी, यल्लम्मा म्हेत्रे, सुशीला सातालोलु , पायल पावडशेट्टी, स्वाती कोटापल्ली, राहीसा शेख, तसेच शहीद कुर्बान हुसेन , कॉ मीनाक्षी साने व कॉ.गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक व पूर्णवेळ कार्यकर्ते आदींनी परिश्रम घेतले.

# विश्वतेजसिंह मोहिते पाटील यांचा शाही विवाह सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे नातू तर आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांचे चिरंजीव विश्वतेजसिंह व चिखली जि.वाशिम येथील श्री उदयसिंह सरनाईक यांची कन्या शीवांशिका यांचा शनिवार दि. ८ मार्च रोजी शाही विवाह सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या सोहळ्यास महाराष्ट्रासह देशभरातील, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. गोरज मुहूर्तावर लाखोंहून अधिक निमंत्रित, मित्र परिवार,पाहुणे यांनी वधूवरास शुभाशीर्वाद देत, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या परिवारातील चौथ्या पिढीचा शाही विवाह सोहळा पाहिला.

या विवाह सोहळ्यास खा. शरदचंद्र पवार, सौ. प्रतिभा पवार, ना रामदास आठवले,ना. शिवेंद्रराजे भोसले, ना. शंभूराज देसाई, सौ. स्मिता देसाई, खा. उदयनराजे भोसले, कल्पनाराजे भोसले सातारा, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विश्वजीतराजे नाईक निबाळकर, विश्वजीत कदम, सौ. स्वप्नाली कदम, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आ.किरण सरनाईक, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, खा. शाहू महाराज छत्रपती, खा. निलेश लंक, खा. बजरंग सोनवणे, संजीवराजे नाईक निंबाळकर, सौ. शिवांजलीराजे नाईक निंबाळकर, श्रीनिवास पवार, सौ. शर्मिला पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना दत्तात्रय भरणे, आ. दिलीप सोपल, आ. नारायण पाटील, आ. उत्तम जानकर, आ.समाधान आवताडे, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. अभिजीत पाटील, आ.राजू खरे, माजी आ. दिलीप माने, दीपक साळुंखे, धनाजी साठे, सिध्दाराम म्हेत्रे, प्रशांत परिचारक, प्रकाश पाटील (पानीव), कल्याणराव काळे यांच्यासह विविध राजकीय पक्षाचे नेते, सहकार, शिक्षण, उद्योग, सामाजिक, नाट्य, चित्रपट क्षेत्रातील असंख्य मान्यवर या विवाह सोहळयास उपस्थित होते. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, खा. धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह परिवारातील सदस्यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

# दूध संघाचे संचालक मंडळ बरखास्त प्रशासक मंडळ नियुक्त

## अध्यक्षपदी पांढरे तर डॉ. साळवे, वडतिले सदस्य

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कामकाजात अनियमितता,कारभार मनमानी, नियमवाह्य करून संस्थेच्या व सभासदांच्या हिताला वाधा आणल्याप्रकरणी सोलापूर जिल्हा दूध उत्पादक व प्रक्रिया संघाचे (दूध पंढरी) संचालक मंडळ बरखास्त करून तीन सदस्यीय प्रशासक मंडळ नियुक्त करण्याचा आदेश विभागीय दुग्ध उपनिबंधक राजकुमार पाटील यांनी दिला आहे. या आदेशाने दूध संघाच्या संचालक मंडळात एकच खळबळ उडाली आहे.तीन सदस्यीय प्रशासक मंडळात जिल्हा (दुग्ध) श्रीनिवास पांढरे हे अध्यक्ष तर सहकारी संस्थांच्या सहायक निबंधक डॉ. वैशाली साळवे व सहकार अधिकारी व्ही. जे.वडतिले यांची सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. विशेष लेखापरीक्षक दूध संघाच्या संचालक मंडळाने जिल्हा सह. दूध उत्पादक या संघ नय सोलापूर दूध पंढरी झालेल्या संचालकांची नावे आहेत.संघ व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने कामकाज न करता सभासदांच्या हितास बाधा आणणारे कृत्य केले आहे. तसेच संघाचे व्यवस्थापन व्यावसायिक पध्दतीने न केल्याने संघाची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आणि तोटा सतत वाढत गेला. संचालक मंडळाने संघाप्रती असलेली कर्तव्ये पार पाडण्यात कसूर केल्याचा ठपका विभागीय दुग्ध उपनिबंधक पाटील यांनी आदेशात ठेवला आहे. अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, उपाध्यक्ष दीपक माळी यांच्यासह बाळासाहेब माळी, मारुती लवटे, औदंवर वाडदेकर, संभाजी मोरे, राजेंद्र मोरे, विजय येलपल्ले,अलका चौगुले, योगेश सोपल, वैशाली शेवडे, बबनराव अवताडे, मनोज गरड, छाया ढेकणे, निर्मला काकडे, जयंत साळे, राजेंद्रसिंह पाटील अशी वरखास्तीची कारवाई झालेल्या संचालकांची नावे आहेत.

सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघाला अनेक वर्षांपासून आर्थिक तोटा होत आहे. संचालक मंडळाचा निष्क्रिय कारभारच याला जवावदार आहे. प्रचंड मोठा तोटा होत असतानाही संचालक मंडळाने काहीच उपाययोजना केल्या नाहीत. संचालक मंडळाच्या कार्यकाळात सभासदांच्या हिताचा कारभार होत नाही, यासह इतर विविध ११ मुद्द्यांवर दूध संघ बचाव कृती समितीचे अध्यक्ष अनिल अवताडे यांनी विभागीय दुग्ध उपनिबंधकांकडे तक्रार दाखल केली होती. याची दखल घेऊन दूध संघाच्या कारभाराच्या चौकशीसाठी विभागीय दुग्ध उपनिबंधकांनी लेखापरीक्षक पी. आर. शिंदे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. शिंदे यांनी चौकशी करून अहवाल सादर केला होता. या अहवालात संचालक मंडळावर अनेक गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत.या अहवालानुसार विभागीय दुग्ध उपनिबंधकांनी संचालक मंडळाला कारणे दाखवा नोटिसा बजावल्या होत्या. याप्रकरणी विभागीय दुग्ध उपनिबंधकांकडे ९ व २२ जानेवारी,५, १७ व २७ फेब्रुवारी रोजी अशा एकूण पाच सुनावण्या झाल्या. यात दूध संघाला व संचालक मंडळाला म्हणणे मांडण्याची संधी दिली होती. त्यानुसार दूध संघ व संचालक मंडळाने वकिलांमार्फत स्वतंत्रपणे खुलासे सादर केले होते; परंतु विभागीय दुग्ध उपनिबंधक पाटील यांनी हे खुलासे अमान्य करीत संचालक मंडळावर वरखास्तीची कारवाई केली आहे.

# अनगर प्रशालेत जागतिक महिला दिन साजरा



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** धनगर येथील काय शंकरा बाजीराव पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय 8 मार्च हा जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य चंद्रकांत ढोले हे होते तर प्रमुख पाहुण्या म्हणून निवृत्त शिक्षिका शकुंतला काळे या होत्या.

स्त्री जन्म देते पालन पोषण करते व उद्धारिते तिने जगातील सर्व क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत ती सहनशील आणि सोशिक आहे तिच्या असण्याने हे जग सुंदर झाले आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी अध्यक्ष स्थानावरून प्राचार्य चंद्रकांत ढोले यांनीही सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी सर्व महिला शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी प्राचार्य चंद्रकांत ढोले, उपप्राचार्य महादेव चोपडे, पर्यवेक्षक माधव खरात, अनुराधा गोडसे, माधवी पाचपुंड, उज्वला घोलप, रंजना सरक, अल्मास बागवान, अर्चना गुंड, अनुपमा निरगिडे, चंद्रकला उघडे, ज्योती भडकवाड, सपना झुरळे, पुनम गुंड, रेश्मा गुंड, प्राजक्ता देंडे, रंजना उंबरे, गीतांजली माळी, अनिता वाघमारे, कदम मॅडम आदी उपस्थित होते सत्यवान दाढे यांनी सूत्रसंचालन केले तर माधव खरात यांनी आभार मानले.

# अकोले (खुर्द) येथील शिंदे विद्यालयाचा विद्यार्थी साईप्रसाद ढवळे महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेत राज्यात पाचवा तर प्रतिक चोपडे राज्यात दहावा



**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** अकोले खुर्द ता माढा येथील मा बबनरावजी शिंदे माध्य व उच्च माध्य विद्यालय अकोले (खुर्द) येथील खालील विद्याथ्यार्नी परीक्षेत गुणवत्ता यादीत नाव झळकवत यश संपादन केले. महाराष्ट्र टॅलेट सर्च परीक्षा (MTS) जळगाव यांच्यामार्फत १९ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आली होती . या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत उज्वल यश खालील विद्यार्थिनींनी संपादन केले :

१) चि. साईप्रसाद आनंदराव ढवळे राज्यात पाचवा व सोलापूर केंद्रात १ ला क्रमांक (इयत्ता ६वी) (२०० पैकी १७४ गुण)

२) चि. प्रतिक नानासाहेब चोपडे राज्यात दहावा क्रमांक व सोलापूर केंद्रात २ रा क्रमांक (इयत्ता ६ वी) (२०० पैकी १६४ गुण)

वरील सर्व विद्यार्थ्यांना प्रज्ञाशोध परीक्षेत उज्वल यश संपादन केल्याबद्दल गुणवंत सर्व विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक धनुसिंग रजपूत सर यांचे अभिनंदन करमाळा तालुक्याचे आमदार तथा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. संजयमामा शिंदे, संस्थेचे सचिव तथा प्रशालेचे प्राचार्य राजेंद्र ठोंबरे सर, प्रशालेतील जेष्ठ शिक्षक संभाजी अनपट सर, स. रा. मोरे प्राथमिक व माध्यमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका मधुरा सुरवसे मॅडम, तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिकचे सर्व शिक्षक - शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या

# संभाजी ब्रिगेडच्या वतीने महिलांचा सन्मान



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने दरवर्षी समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असलेल्या महिलांचा सन्मान करण्यात येतो महिला दिनी उच्चशिक्षित उच्चपदस्थ अधिकारी व इतर वेगवेगळ्या क्षेत्रातील सर्व सन्माननीय महिलांचा सन्मान या दिवशी केला जातो पण समाजा च्या मुख्य प्रवाहातून वंचित असलेल्या जसे वीटभट्टी वरील कामगार महिला, कचरा वेचणाऱ्या महिला, भाजी विक्रेत्या महिला, सफाई कामगार महिला, अशांच्या सन्मान संभाजी ब्रिगेड च्या वतीने करण्यात येतो यावर्षी सुद्धा चाळीस वषार्पासून सिद्धेश्वर मंदिरासमोरील फुटपाथ वरील पालावर सेवाभावी वृत्तीने गोरगरिबांसाठी अत्यल्प कमी दरामध्ये भोजन उपलब्ध करून देऊन आपल्या संसाराचा गाडा स्वाभिमानाने हाकणाऱ्या महिलांचा मानाचा फेटा सन्मानचिन्ह व मिठाई देऊन त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान करण्यात आला.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, संपर्कप्रमुख छत्रगुण माने, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम, सिद्धाराम सवयगी, सतीश वावरे, दिलीप निंबाळकर, गजानन शिंदे, संतोष सुरवसे, यशवंत लोंढे, गौरीशंकर वरपे, रमेश भंडारे, सुमित मंद्पकर, मल्लिकार्जुन शेवगार, श्रवण साळुंके, बबन डीगणे, प्रेम भोसले, महिला जिल्हाध्यक्ष मीनलताई दास, शहराध्यक्ष मोनाली धुमाळ, माधुरी चव्हाण, संजीवनी सलबत्ते, जयश्री जाधव, अश्विनी पाटील, सुनिता घंटे आदी उपस्थित होते.



## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन**: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | ८ |
| | ■ | ९ | | ■ | १० | | ■ | | ■ | ११ | |
| १२ | | | | ■ | ■ | १३ | | | ■ | ■ | |
| | ■ | ■ | १४ | १५ | १६ | ■ | ■ | | ■ | १७ | |
| ■ | १८ | | ■ | १९ | | ■ | २० | | | | ■ |
| २१ | | ■ | २२ | | | ■ | २३ | | ■ | ■ | २४ |
| ■ | २५ | | | | ■ | २६ | | | | | ■ |
| २७ | ■ | ■ | २८ | | ■ | | ■ | | ■ | ■ | २९ |
| ३० | ३१ | | ■ | ■ | ३२ | | | | ■ | ३३ | |
| ३४ | | ■ | ३५ | | | | ■ | ३६ | | | |
| ३७ | | ३८ | | ■ | ■ | ३९ | ४० | | ■ | ४१ | |
| ■ | ■ | ४२ | | | ■ | ■ | | ■ | ४३ | | ■ |

**उभे शब्द :** १) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा धनुर्धर
२) भुजबळ या जिल्ह्यातून विधानसभेवर निवडून गेले आहेत
३) अंगावर शहारे आणणारे असे
४) भीती (हिंदीत)
५) नोकर ६) राज ठाकरे यांचा पक्ष
७) उशीर (हिंदीत)
८) कॉलनी (मराठीत)
१५) कामात मदत करणारा
१६) एक म्हण-*** तोंडी मोठा घास
१७) कपाळ १८) उष्ण
२०) पूर्वी पाणी आणण्यासाठी वापरली जायची ती चामड्याची मोठी गोण
२२) बोझा, भार
२६) खर्चात केलेली बचत २७) विधानसभेवर निवडून दिला जाणारा लोकप्रतिनिधी २९) पंधरा आणि सोळा मिळून होणारी संख्या
३१) शपथ (हिंदीत)
३२) होता जिवा म्हणून वाचला **
३३) माशाचा एक प्रकार
३५) जंगलात लागलेली आग
३८) महिना, माह
४०) बदामाप्रमाणे सुक्या मेव्यातील एक घटक

**आडवे शब्द :** १) भाजपमधून राष्ट्रवादी पक्षात आलेले राज्यातील एक ज्येष्ठ नेते
६) शिवशंकराचे एक नाव
९) रव्यापासून बनविलेला गरा १०) वर उलट लिहा
११) पृथ्वी, पातळ कालवण १२) पटकन, त्वरेने
१३) केर *** १४) एक दाक्षिणात्य राजकारणात प्रवेश केलेला अभिनेता-*** हसन १७) शिजवलेला तांदूळ १८) दुर्ग, किल्ला
१९) पाच दुणे २०) रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेले शहर
२१) बे दुणे २२) इनाम म्हणून मिळालेली जमीन २३) वखा उलट लिहा
२४) शंभर (हिंदीत) २५) जुन्या मराठी चित्रपटातील अभिनेता-रवींद्र ****
२६) हे कॅलेंडर प्रसिध्द आहे २८) सन उलट लिहा
३०) राशीचक्रातील एक रास ३२) दूध आणि केळीचे मिश्रण
३३) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** ३४) गुलाम
३५) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो ३६) सैन्याचा प्रमुख
३७) मग्न, लीन ३९) कागदाचा चर्तुथांश स्तंभ, कॉलम
४१) बुटाची दोरी ४२) प्रश्न (हिंदीत)
४३) या प्राण्याला वाळवंटातील जहाज म्हणतात

## सुडोकु - 196

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 8 | 3 | | | | 9 |
| | | 6 | | 4 | | 2 | 8 | 1 |
| 2 | 8 | | 1 | 9 | | 7 | 3 | 5 |
| | | 2 | 9 | | 4 | | | 3 |
| 8 | | 1 | | | | | 9 | |
| 5 | | | | 1 | 3 | | 7 | 2 |
| | | | | | | | 4 | |
| 7 | | 3 | | 2 | 9 | 1 | 5 | |
| 4 | | 5 | | | | 9 | | 6 |

# अन्यथा आमदारांना तालुक्यात फिरु देणार नाही- मुन्ना साठे

**माढा (कटूसत्य वृत्त):-** साडेतीन हजार रुपये ऊसाला पहिली उचल देणार असल्याची जाहीर घोषणा करुन माढा विधानसभेची निवडणूक ३० हजाराने जिंकलेल्या आमदार अभिजित पाटील यांनी कारखान्याचा गाळप हंगाम बंद झाल्यानंतर देखील ऊसाला जाहीर केलेला दर न देता शेतकऱ्यांची घोर फसवणूक केली आहे.

जाहीर केलेला दर येत्या आठ दिवसांत न दिल्यास त्यांना माढा तालुक्यात फिरु देणार नसल्याचा गर्भित इशारा देऊन देशाचे नेते शरद पवारांकडे या संदर्भात तक्रार करणार असल्याचे शिवसेना शिंदे गटाचे माढा तालुका प्रमुख मुन्ना साठे यांनी दिला आहे.

ऊस दराच्या मुद्यावरुन मतदार संघातील कोणत्याही कारखानदारांनी भुमिका मांडली नसुन शिवसेनेचे तालुका प्रमुख मुन्ना साठेकडे ऊस उत्पादक शेतकर्यांनी व्यथा मांडल्यानंतर साठेनी आक्रमक पवित्रा घेऊन या प्रश्नाला वाचा फोडली आहे.

या संदर्भात मुन्ना साठेनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट भुमिका मांडली आहे.



माढा लोकसभा मतदारसंघातून यापूर्वी खा. शरद पवार यांनी निवडणूक लढवली होती. त्यांनी त्यावेळी माढ्याची बारामती करु असे आश्वासन दिले होते. त्याच पध्दतीने त्यांच्याच पक्षाचे स्वतःला धपकाकिंग म्हणवून घेणारे आ.अभिजित पाटील यांनी ऊसाला प्रतिटन साडेतीन हजार रुपयांच्या दराची घोषणा केली होती.

त्या आश्वासनासंदर्भात न बोलता त्यांच्या कारखान्याने ऊस उत्पादक शेतकर्यांपैकी काहींना २८०० रुपयांचा व काहींना २००० रुपयांचा ॲडव्हांस दिला आहे. आमदारांनी याबाबत खुलासा करुन आश्वासनाची पुर्तता करावी.महिला दिनाच्या निमित्ताने आमदार कार्यक्रम राबवितात पण महिलांनी श्रम करून पिकवलेला

सीनेकाठी व माढा भागात शेतीसाठी फक्त दोन तीन तास वीज उपलब्ध होते आहे. वीजेचे नियोजन आमदार चुकवत आहेत.यातून सरकारची बदनामी होते. विरोधी पक्षाचे आमदार असल्याने ते जाणीवपूर्वक वीजेच्या बाबतीत चुकीची भूमिका घेऊन सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत.

### आमसभा ही 'आम' खाण्यासाठीच

माढ्यात झालेल्या आमसभेवर टीका करताना मुन्ना साठे म्हणाले की प्रशासनाला धारेवर धरत आमसभेत अधिकाऱ्यांकडून "आम "खाता यावेत म्हणून सभेचे आयोजन केले गेले होते.असा आरोप देखील साठेनी केलाय.आमसभेत उपस्थित झालेले नागरिकांचे किती प्रश्न सुटले याचा शोध घ्यावा लागेल.

### कारखानदार -विरोधक शांतच;तालुका प्रमुख आक्रमक

माढा मतदार संघाची आमदार अभिजीत पाटलांच्या विरोधात निवडणुक लढवलेले रणजितसिंह शिंदे,असोत अथवा त्यांचे वडिल माजी आ.बबनराव शिंदे यांचेसह माजी आमदार धनाजीराव साठे,भैरवनाथ शुगरचे अध्यक्ष प्रा.शिवाजीराव सावंत,अजित पवार गटाकडून निवडणुक लढवलेल्या मीनल साठे यांचेसह मतदार संघातील अन्य मातब्बर विरोधक ऊस दराच्या मुद्यावरुन शांतच आहेत.तर दुसरीकडे मात्र शिवसेनेचे तालुकाप्रमुख मुन्ना साठे हे सगळ्या मंडळींना भारी ठरले असून शेतकयार्चा प्रश्न त्यांनी उपस्थित करुन आवाज उठवलाय.

ऊसदराच्या मुद्द्यावर काही बोलत नाहीत.

निवडणूकीत शेतकऱ्यांचा ऊस गाळपाबाबतही ते म्हणाले होते की माझा कारखाना दहा हजार गाळप क्षमतेचा आहे. माढा तालुक्यात तीनशे वहाने देतो पण प्रत्यक्षात तीस वाहनेही दिली गेली नाहीत.ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे.माढा मतदार संघात आमदार अभिजीत पाटील विरुध्द शिवसेना शिंदे गट असा राजकीय सामना येत्या काळात पहायला मिळणार आहे.यावर आ. अभिजीत पाटील काय भुमिका मांडतात हे पहावं लागणार आहे.

# श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जाहीर; १७ एप्रिल रोजी होणार मतदान

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरणाने दि. ०६ मार्च रोजी राज्यातील संचालक मंडळाची मुदत संपलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. यानुसार तालुक्यातील आदिनाथ सहकारी साखर कारखान्याची निवडणुक जाहीर करण्यात आली असून असून दि. १० मार्च पासून १९ एप्रिल पर्यंत ही निवडणूक प्रक्रिया चालणार असल्याची माहिती तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी दिली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अमोल भोसले (भू संपादन अधिकारी-१, सोलापूर) हे श्री आदीनाथ सहकारी साखर कारखान्याची निवडणूक पार पाडणार आहेत.



निवडणूक निर्णय अधिकारी भोसले यांनी एकूण सहा मतदार संघातून २१ सदस्यांच्या निवडणुकीकरिता विविध टप्पे तयार केले असून दि. १० मार्च ते दि. १७ मार्च पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात (तहसीलदार यांचे दालन, तहसील कार्यालय करमाळा) नामनिर्देशन पत्र दाखल करता येणार असून प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दि. १८ मार्च रोजी छाननी प्रक्रिया होणार असून दि. १९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात विधी ग्राह्य नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दि. १९ मार्च ते ०२ एप्रिल पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्र मागे घेता येणार असून दि.०३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता अंतिम विधी ग्राह्य नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. याच दिवशी उमेदवारांना निशाणी वाटप करण्यात येणार आहे.

दि. १७ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायं.५ पर्यंत श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळासाठी मतदान घेण्यात येणार असून दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. मतमोजणीनंतर लगेचच निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

जेऊर, सालसे, पोमलवाडी, केम, रावगाव अशा पाच ऊस उत्पादक सभासद गटांतून प्रत्येकी ३ प्रमाणे एकूण १५ प्रतिनिधी तर उत्पादक सहकारी संस्था, बिगर उत्पादक संस्था व पणन संस्था प्रतिनिधी - १, अनु. जाती/अनु. जमाती प्रतिनिधी (१), महिला राखीव प्रतिनिधी (२), इतर मागासवर्गीय जाती प्रतिनिधी (१) व भटक्या वि. जाती व जमाती विशेष मागास प्रवर्ग (१) अशा एकूण ६ मतदार संघांतून एकूण २१ प्रतिनिधी या प्रक्रियेद्वारे निवडण्यात येणार आहेत.

# जिल्हास्तरीय महिला बचत गट उत्पादन वस्तूंचे भव्य प्रदर्शनाचे कुलदीप जंगम यांचे हस्ते उद्घाटन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिला आर्थिक विकास महामंडळ, सोलापूर अंतर्गत नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्योम विकास प्रकल्प अंतर्गत माविम 50 वा वर्धापन दिन व जागतिक महिलां दिन निमित्त जिल्हा स्तरीय बचत गटाचे उत्पादनाचे भव्य प्रदर्शन व विक्री चे आयोजन दिनांक 8 मार्च ते 10 मार्च दरम्यान आयोजित करण्यात आलेल आहे.

यावेळी कार्यक्रमाचे उदघाटन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर, कुलदीप जंगम यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी पोलीस अधीक्षक, (ग्रामीण) अतुल कुलकर्णी त्यांच्या धर्मपत्नी सौ. महीमा कुलकर्णी, PSI भरोसा सेल, ग्रामीण पोलीस. सुरेखा शिंदे, जिल्हा विकास व्यवस्थापक, नाबार्ड सोलापूर नितीन शेळके, सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता सोलापूर संगीता खंदारे, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार माविम,



पुणे विभाग. सिद्धिराम माशाळे, उद्योगवर्धिनी, सोलापूर चंद्रिका चव्हाण आदी उपस्थितीत होते.

या कार्यक्रमाच्या वेळी कुलदिप जंगम यांनी बचत गटाच्या उत्पादनासाठी जिल्हास्तरावर एक स्वतंत्र दालन निर्माण करून त्या ठिकाणावरून सर्व उत्पादनाची विक्री व मार्केटिंग होईल आणि लवकरच याची सुरवात होईल असे आश्वासन दिले. सौ. कुलकर्णी मॅडम यांनी त्याच्या भाषणात महिलांन बरोबर संवाद साधताना महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत.

आणि त्याही कोणत्याही कामात पुढाकाराणे पुढे आल्यास त्या कामात उच्च शिखरावर पोहचतील अशी अशा व्यक्त केली.

अतुल कुलकर्णी सर बोलताना म्हणाले पोलीस प्रशासन सदैव महिलांन सोबत आहे. महिलांना कोणत्याही अडचणी असल्यास त्यानी पोलिसांची निसंकोच संपर्क करावा असे अहवान केले व सर्वानी विषमुक्त शेती करून आपले आपल्या कुटुंबाचे आरोग्य सुधारावे असे प्रतिपादन केले. सिद्धिराम माशाळे साहेब आपले मनोगत व्यक्त करताना माविम तर्फे चालवण्यात येणारे उपक्रम व नवतेजस्विनी प्रकल्प अंतर्गत उप-प्रकल्प अंमलबजावणी बाबत मार्गदर्शन केले कर्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हा समन्वयक अधिकारी सोमनाथ लांमगूंडे यांनी माविमची सोलापूर तालुक्यातील वाटचाल व प्रगती बाबत मनोगत व्यक्त केले. यावेळी मोहोळ तालुक्यातील बचत गट सदस्य, पदाधिकारी, cmrc स्टाफ, मोहोळ व माळशिरस तालुका कर्मचारी उपस्तित होते.

कार्यक्रमचे सूत्रसंचालन प्रशांत गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन सहायक जिल्हा समन्वय अधिकारी सतीश भारत यांनी केले.

# शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्या जिल्हाध्यक्षपदी देविदास राठोड



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** धावत्या युगात युवा पिढीही वेगवान झाली आहे. पुस्तके वाचण्यासाठी त्यांच्याकडे वेळच नसतो. किंबहुना त्यांचा वाचनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निरस झाला आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देत वाचनाची गोडी लावणे गरजेचे आहे. शिक्षक, शाळा आणि ग्रंथालये यांनी यात पुढाकार घेत भावी पिढीला वाचनाची आवड लावली तरच ही वाचन संस्कृती टिकून राहील, असे प्रतिपादन सोलापूर शिवसेना जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राठोड यांनी संवाद साधताना सांगितले.

शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्या अध्यक्षपदी अक्कलकोट तालुक्यातील जेऊरवाडी येथील जेष्ठ समाजसेवक देविदास राठोड यांची निवड करण्यात आली या निवडीचे पत्र शिर्डी येथे झालेल्या शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत राज्य अध्यक्ष बीजी देशमुख,शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले.

यावेळी ग्रंथालय संघटनेचे तालुकाध्यक्ष शंकर माळी, ग्रंथालय सेलचे तालुकाध्यक्ष बिराप्पा पुजारी, पत्रकार स्वामीराव गायकवाड, पुंडलिक पांढरे, शिवराया प्रचंडे उपस्थित होते. शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी देविदास राठोड यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरावर वरून कौतुक आणि शुभेच्छाचे वर्षाव होतं आहेत.

# जि.प.शाळा बोपले येथे महिला दिन साजरा



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** जि.प.शाळा बोपले ता.मोहोळ येथे महिला दिन विविध उपक्रमानी उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. उच्चशिक्षित माता व निपून भारत अंतर्गत लिडर माता यांचा सत्कार करून अनेक विद्यार्थी व महिलांनी कविता,गीतगायन व मनोगतातून नारी शक्तीचा गुणगौरव केला.प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना नवनियुक्त विज्ञान शिक्षिका मधुराणी शिंदे यांनी स्वानुभव सांगत यशस्वी होण्यासाठी अविरत कष्ट ,सहकार्य आणि संघर्ष करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. आप्पासाहेब देशमुख यांनी मार्गदर्शन करताना माता पालकांनी बालकांच्या स्वच्छता,आरोग्य व अभ्यासाकडे विशेष लक्ष देण्याची विनंती करुन निपुण भारत अभियान, बचत गट तसेच शासन व जिल्हा परिषद मार्फत महिला व बालकांच्या सक्षमीकरणासाठी चालू असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

यावेळी उपस्थित महिलांच्या पाक कला, उखाणे आणि संगीत खूर्ची अशा स्पर्धा घेऊन विजेत्या महिलांना बक्षीस वितरण करण्यात आले.याप्रसंगी मयुरी ढेरे,अनिता ढेरे,माधुरी पासले, विजयश्री पोतदार,सुषमा वाघमारे,अनिता वाघमारे ,रुपाली खांडेकर,सपना लंगर,अश्विनी ढेरे, जयश्री पोतदार,उषाबाई करंडे,आशा लकडे यांच्यासह मातापालक बहुसंख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अश्विनी मिटकरी,महादेवी पवार,ऐश्वर्या स्वामी,मुख्याध्यापक परमेश्वर गुंड यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन धनश्री वाघमारे व ईश्वरी ढेरे यांनी केले तर आभार समाधान थिटे यांनी मानले.

# महिलांनी न डगमगता पुढे गेले पाहिजे- स्मिता पाटील

## श्रमिक पत्रकार संघात माध्यमात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महिलांना प्रत्येक वेळी समाज व्यवस्थेने प्रोत्साहन दिले आहे. देवी नव्हे तर महिला म्हणून समानतेची वागणूक मिळाली पाहिजे. महिला सक्षमपणे विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. महिलांनी न डगमगता पुढे गेले पाहिजे. केवळ महिला दिनच नव्हे तर प्रत्येक दिवशी महिलांसाठी जगण्याचा महोत्सव साजरा व्हायला पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडीच्या वतीने माध्यमात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात पार पडला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील आणि



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्याध्यक्षा चित्रा कदम यांच्या हस्ते माध्यमात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विचार मंचावर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे , सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील पुढे म्हणाल्या, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांनी छत्रपती शिवरायांना घडविले. महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांनी महिलांच्या हातात पुस्तक देऊन स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे केले. ऋषीमुनींच्या काळातही विद्वान महिला होत्या. आज विविध क्षेत्रात महिला या धैयार्ने काम करत आहे. आपला वेगळा ठसा उमटविला आहे. कौटुंबिक आणि करिअर या दोन्ही जबाबदाऱ्या महिलांना पार पाडाव्या लागतात. यामध्ये कुटुंबाकडे दुर्लक्ष व्हायला नको, असेही त्या म्हणाल्या.

प्रास्ताविक सरचिटणीस सागर सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन खजिनदार किरण बनसोडे यांनी केले. पत्रकार अश्विनी तडवळकर यांनी आभार मानले. याप्रसंगी सत्कारमूर्ती महिलांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विविध माध्यमातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### समाज घडविण्याचे महान कार्य महिलांकडून घडते : चित्रा कदम

कार्याध्यक्षा चित्रा कदम यांनी जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत महिला दिन हा दररोज साजरा झाला पाहिजे. महिलांचा सन्मान केला पाहिजे. महिला या विविध क्षेत्रात धैयार्ने, जिद्दीने, चिकाटीने आपला ठसा उमटवीत आहेत. कुटुंबाबरोबरच समाज घडविण्याचे महान कार्य महिलांकडून घडते. त्यांना पाठबळ आणि प्रोत्साहन देण्याची गरज आहे, असे त्या म्हणाल्या.

# छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात महिला दिन साजरा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय "वुमेन एम्पॉवरमेंट सेल" अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि अँटी रॅगिंग समितीच्या वतीने महिला दिनानिमित्त डॉक्टर सुचित्रा पाटणकर यांचे "महिलांचे मानसिक आरोग्य" या विषयावरती व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

मानसिक समस्यांचा सामना पुरुषांच्या तुलनेने महिलांना अधिक प्रमाणात करावा लागतो. मानसिक आरोग्य उत्तम राखायचे असेल तर सर्वप्रथम शारीरिक आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे,चौरस आहार घेणे, नियमितपणे व्यायाम करणे, सुसंवाद साधने गरजेचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. हार्मोनल असंतुलन, पीसीओडी, मासिक पाळीच्या समस्या यातून जात असताना महिलांना शारीरिक समस्यांबरोबरच मानसिक आरोग्याशी ही मुकाबला करावा लागतो. आपले मानसिक स्वास्थ्य योग्य आहे की नाही हे सर्वप्रथम आपल्याला ओळखता आले पाहिजे.

सततची होणारी चिडचिड, निद्रानाश, अति विचार तसेच वाईट विचार मनात येणे इत्यादी गोष्टी आपल्या बाबत होत असल्यास आपले मानसिक आरोग्य धोक्यात आहे हे आपण ओळखावे. वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेणे व गरज असल्यास मानसोपचार तज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे असल्याचे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाची प्रास्ताविक करताना डॉ. राणी मोटे यांनी महिला दिनाची पार्श्वभूमी विशद करून भारतीय समाजामध्ये रमाबाई रानडे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांसारख्या स्त्रियांनी स्त्री शिक्षणाद्वारे स्त्रीमुक्तीची बीजे रोवली असे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अरुण मित्रगोत्री, प्रा.डॉ. अभिमन्यू ओहोळ, प्रा.डॉ. युवराज सुरवसे, प्रा.डॉ. वाल्मीक किर्तीकर, प्रा. भुसे, प्रा.कुचेकर, प्रा. गायकवाड, प्रा. जवळगीकर, प्रा. शहा. मॅडम, शहाजी जाधव ,संतोष अलकुंटे, केशव लोंढे, संजय थिटे, सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉक्टर मधुकर पवार होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये त्यांनी स्त्री पुरुष असमानतेची दरी मिटवण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वर्षाराणी शिंदे तर आभार प्रा. संघमित्रा चौधरी यांनी केले.

# वीरशैव कक्कय्या महिला प्रतिष्ठानच्या वतीने महिला दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हळदीकुंकू व महिला दिनानिमित्त दिनांक ७ मार्च २०२५ रोजी समाजकल्याण केंद्र रंग भवन येथे पुरुषांच्या बरोबरीने व त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या आपल्या भगिणींचा सत्कार सोहळा वीरशैव कक्कय्या महिला प्रतिष्ठान संस्थापिका अध्यक्षा संगीताताई जोगधनकर यांनी आयोजित केला होता.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मृणालिनी मोरे (सायकोलॉजिस्ट,कोन्सलर) व पद्मा सारोळे ( चंडक कॉलेज पर्यावरण शिक्षिक) यांची उपस्थिती होती. व त्याच बरोबर सौ. मनीषा जोगधनकर, सौ.पवित्रा सोनकवडे, सौ.रेखा होटकर, सौ. प्रभावती व्हटकर, सौ छाया व्हटकर, सौ. रेश्मा सोनवणे, सौ. संगीता होटकर, सौ.वंदना होटकर, सौ.कांचन व्हटकर, सौ. रितु काटकधोंड आदी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्या निकेतन प्रशालेत जागतिक महिला दिन अतिशय उत्साहात साजरा

**मसले चौधरी (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील मसले चौधरी येथील विद्या निकेतन प्रशालेत दि.8 मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिपाली पद्मसिंह सिरसट ह्या होत्या. याप्रसंगी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन ग्रामपंचायत सदस्या रेश्मा पोटरे, प्राथमिक शाळेच्या शिक्षिका सौ. संगीता गावडे, दिपाली सिरसट व दिपाली साखरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाने दि. 8 मार्च जागतिक महिला दिनानिमित्त विद्या निकेतन प्रशालेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेल्या रेश्मा पोटरे,



सोनाली पाटील,संगिता गावडे, दिपाली साखरे, महानंदा गुंड, कांचन पवार, अंजना पोटरे, व वंदना दळवी या आठ कर्तबगार महिला भगिनींचा आदरपूर्वक, सन्मानचिन्ह व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी उपस्थित सर्व माता पालकांचे यथोचित सत्कार करण्यात आला, वंदना दळवी यांनी 21 व्या शतकातील विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करण्याची गरज आहे असे आपल्या मनोगतातून प्रतिपादन केले. रविकांत साबळे यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व आपल्या मनोगतातून पटवून दिले. नागनाथ धुमाळ सरांनी महिला सबलीकरणाविषयी महत्त्व पटवून दिले. अध्यक्षीय भाषणातून दिपाली पद्मसिंह सिरसट यांनी विद्यार्थी हा शाळेत घडत असून शाळेत राबवणाऱ्या विविध उपक्रमाविषयी समाधान व्यक्त केले.

यावेळी सर्व उपस्थित मतापालकांचे चरण पुजन करून विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आशीर्वाद घेतले.

याप्रसंगी रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, जलद गतीने बाटल्या ठेवण्याच्या स्पर्धा व उखाण्याच्या स्पर्धा अशा विविध मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी कुसुम पोटरे, शितल पोटरे, वंदना पोटरे, वैशाली फंड, अर्चना सिरसट, मिनाक्षी कोळी,श्रीमती सुमन व्हनकोंबडे चव्हाण ताई, पवार, प्रतिक्षा भोसले, हसीना शेख व बहुसंख्य माता पालक व प्रशालेतील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांचन पवार यांनी केले.तर कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलेल्या सर्व माता-पालकांचे शिवानंद बोधले यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी अंजना पोटरे, गजानन पाटील, शहाजी आतकरे, गोविंद जांभळे व संतोष वाघमोडे यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात महिला दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय कुमठे सोलापूर येथे 8 मार्च 2024 रोजी प्रशालेमध्ये जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला प्रथमतः क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. ब्रह्मदेव दादा माने यांच्या प्रतिमेचे पूजन राष्ट्र विकास प्राथमिक विद्यामंदिर च्या मुख्याध्यापिका मंगला नाईक नवरे यांच्या हस्ते करण्यात आले. जागतिक महिला दिनानिमित्त कुमठे प्रशालेच्या सहशिक्षिका सौ. रूपाली खाडे व राष्ट्र विकासच्या विद्या मंदिर च्या सहशिक्षिका सौ. कांचन कुलकर्णी यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास कुमठे प्रशालेचे मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड, पर्यवेक्षक वसंत गंगे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख संजय जाधव उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रशालेतील सर्व महिला शिक्षिका यांचा सन्मान करण्यात आला. प्रशालेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. जमखंडी कर यांनी केले.तर सूत्रसंचालन कुमठे प्रशालेच्या सहशिक्षिका सौ कुडले यांनी केले